# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

१ ला मज़ला,
सिडको भवन,
(दक्षिण कक्ष) बेलापूर,
नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी : ७५७ १६६६
७५७ १६७७
फॅक्स : ७५७ ०९६९

क्र. मजीप्रा/1097/सभा-74/आ-4.

1997/09/18.

M. J. P.
MUMBAI-21.
1997
RECEIVED

1558
29/9

प्रति,

अध्यक्ष, महा. जीवन प्राधिकरण
तथा मंत्री, ग्राम विकास पा.पु.व स्वच्छता विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सह अध्यक्ष, महा. जीवन प्राधिकरण,
तथा मंत्री, नगर विकास,
मंत्रालय, मुंबई 32.

उपाध्यक्ष, महा. जीवन प्राधिकरण,
तथा राज्यमंत्री नगर विकास पा.पु.व स्व.विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
तथा अपर मुख्य सचिव पा.पु.व स्व.विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
तथा प्रधान सचिव, नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
तथा प्रधान सचिव वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
तथा सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण
तथा सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मंत्रालय, मुंबई 32.

सदस्य, महा. जीवन प्राधिकरण
तथा सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय, मुंबई 32.

महापौर, नागपूर महानगरपालिका

अध्यक्ष, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग
तथा सदस्य महा. जीवन प्राधिकरण

श्री. सुरेश पटवर्धन,
सदस्य महा. जीवन प्राधिकरण,
पुणे.

श्री. माधव कुलकर्णी,
सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
पुणे.

श्री. आदिनाथ नवले पाटील,
सदस्य महा. जीवन प्राधिकरण,
नवा मोंढा, ता.जि. बीड.

श्री. भानुदास पाडळकर,
सदस्य, महा. जीवन प्राधिकरण
सांगली.

श्री. आशिष कुलकर्णी,
सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
वरळी, मुंबई 25.

श्री. राजीव सरदेशपांडे,
सदस्य, महा. जीवन प्राधिकरण,
नागपूर.

श्री. जे.एस. साहनी,
सदस्य सचिव (प्रशासन व बाहय अर्थ सहाय्य)
महा. जीवन प्राधिकरण,
मुंबई 21.

श्री. राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव (तांत्रिक)
महा. जीवन प्राधिकरण,
मुंबई 21.

विषय : महा. जीवन प्राधिकरणाची 74 वी सभा.

महोदय,

दिनांक 30.7.97 रोजी झालेल्या मंडळाच्या 74 व्या सभेचे इतिवृत्त सोबत पाठविण्यांत येत आहेत.

वरील इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास ते या कार्यालयास कृपया पाठवावे म्हणजे ते मंडळाच्या पुढील सभेत विचारासाठी ठेवण्यांत येतील.

आपला
नि.कृ. माडा

सोबत : इतिवृत्त पृ.क्र.१-10

(नि.कृ. माडा)
मुख्य प्रशासकीय अधिकारी.

प्रतिलिपी,

मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, ठाणे/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर/ जागतिक बँक ठाणे, महा. जीवन प्राधिकरण.
मुख्य प्रशासकीय अधिकारी, महा. जीवन प्राधिकरण, मुंबई.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महा. जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.

प्रत माहितीसाठी,

अधीक्षक अभियंता, मुख्यालय/ म.नि.सं.व सं.कक्ष, महा. जीवन प्राधिकरण, मुंबई.
उप मुख्य लेखा अधिकारी 1/2/3, महा. जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.
आस्थापना अधिकारी (द), महा. जीवन प्राधिकरण, मुंबई.
जनसंपर्क अधिकारी, महा. जीवन प्राधिकरण, मुंबई.
प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, महा. जीवन प्राधिकरण, नवी मुंबई.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण.

दिनांक 30.7.1997 रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 74 व्या सभेचे इतिवृत्त :--

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची 74 वी सभा बुधवार दिनांक 30.7.1997 रोजी सकाळी 11.00 वाजता प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा माननीय मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे दालनात मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली. सदर सभेस प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

1. मा.ना.श्री.अण्णासाहेब डांगे,
   अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा मंत्री,
   पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
   मंत्रालय, मुंबई.

2. श्री.व्ही. रंगनाथन,
   सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा
   प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,
   मंत्रालय, मुंबई.

3. श्री.के.नलिनाक्षन,
   सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तथा
   प्रधान सचिव, नगर विकास,
   मंत्रालय, मुंबई.

4. श्री.झनकर, उप सचिव,
   सदस्य, महा. जीवन प्राधिकरण व
   सचिव वित्त विभाग यांचे प्रतिनिधी,
   मंत्रालय, मुंबई.

5. श्री.देवेन्द्र फडणवीस,
   महापौर, नागपूर महानगरपालिका तथा
   सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   नागपूर.

6. श्री.राजन तेली,
   अध्यक्ष, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग,
   तथा सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   सिंधुदुर्ग.

7. श्री.सुरेश पटवर्धन,
   सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
   पुणे.

8. श्री. माधव कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
पुणे.

9. श्री.आदिनाथ नवले पाटील,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नवा मोंढा, बीड.

10. श्री. भानुदास पडळकर,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
सांगली.

11. श्री. आशिष कुलकर्णी,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
वरळी, मुंबई.

12. श्री.राजीव सरदेशपांडे,
सदस्य, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
नागपूर.

13. श्री.राजेंद्र सगणे,
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुंबई.

प्राधिकरणाच्या सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सदस्यांची रजा मंजूर करणेत आली.
महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी ''विशेष निमंत्रित'' म्हणून उपस्थित होते :-

1. श्री.शे.दा. अरमाळ, मुख्य अभियंता (कोकण विभाग)
2. श्री. सु.का. पाटील, मुख्य अभियंता (नाशिक विभाग)
3. श्री. स.वि. शेळकीकर, मुख्य अभियंता (पुणे विभाग)
4. श्री. नि.कृ.माळा, मुख्य प्रशासकीय अधिकारी.
5. श्री. भा.आ. डोंगरे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी.

प्राधिकरणाचे सदस्य सचिव, श्री. राजेंद्र सगणे यांनी प्रथम माननीय नामदार श्री.अण्णासाहेब डांगे, अध्यक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व उपस्थित सदस्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

**कार्यक्रम बाब क्र.1 : 72व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे :-**

प्राधिकरणाच्या 72व्या सभेच्या इतिवृत्तावर सदस्यांनी कोणत्याही सूचना अथवा दुरुस्ती प्रस्तावित न केल्याने इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.2 – 72व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर करण्यांत आलेली कृती :–**

प्राधिकरणाच्या 72व्या सभेतील कार्यक्रम बाबीवरील केलेली कृती सदस्य सचिवांनी वाचून दाखविली. त्यावर कोणत्याही सूचना न आल्याने 72व्या सभेतील सर्व बाबींवरील कृती सभेत मान्य करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.3** : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 73व्या सभेच्या इतिवृत्तास मान्यता देणे :–

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या 73व्या सभेचे इतिवृत्त सर्व सदस्यांना पाठविण्यांत येऊन त्यावरील अभिप्राय विचारण्यात आले होते. कोणत्याही सदस्यांकडून त्यावर कोणतेही अभिप्राय प्राप्त न झाल्याने सदर इतिवृत्त मंजूर करण्यांत आले.

**कार्यक्रम बाब क्र.4** : 73व्या सभेच्या कार्यक्रम बाबीवर करण्यात आलेली कृती :–

प्राधिकरणाच्या 73व्या सभेतील कार्यक्रम बाबीवर केलेली कृती सदस्य सचिवांनी सभेत वाचून दाखविली. त्यावर कोणतीही सूचना न आल्याने 73व्या सभेतील सर्व बाबींवरील कृती सभेत मान्य करण्यांत आली.

**कार्यक्रम बाब क्र.5** :– प्राधिकरणाच्या न्हावा–शेवा पाणी पुरवठा केंद्रातून पनवेल नगरपालिकेच्या नागरी भागास होणा–या पाणी पुरवठयाबाबतचे दर निश्चित करणे :–

न्हावा–शेवा पाणी पुरवठा केंद्रातून पनवेल नगरपालिकेच्या नागरी भागास होणा–या पाणी पुरवठयाचे दर रु. 5.65 प्रति 1000 लि. वरुन रु. 6.50 प्रति 1000 लि. असे 1/5/97 पासून लागू करण्यात आल्याची माहिती प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. सदर वाढीव दरास नगरपालिकेने त्यांच्या दि. 12/4/97 च्या पत्रान्वये निवेदनाद्वारे प्राधिकरणास अशी विनंती केली की, नगरपालिकेची आर्थीक कुवत विचारात घेता रुपये 6.50 / 1000 लि. या वाढीव दराने पाणी विकत घेतल्यास नगरपालिकेच्या विकास कामावर फार मोठया प्रमाणावर विपरीत परिणाम होतील. म्हणून दि. 1/5/97 पासूनचा सुधारित रु.6.50 / 1000 लि. या दराऐवजी पूर्वीचेच दर म्हणजे 5.65 /1000 लिटर पनवेल नगरपालिकेस आकारावेत. यावर प्राधिकरणाचे वित्तीय सल्लागार व मुख्य लेखाधिकारी यांनी सभेच्या असे निदर्शनास आणून दिले की, सन 1997–98 साठी निश्चित केलेल्या दरानुसार प्राधिकरणास न्हावा–शेवा पाणी पुरवठा केंद्रातून होणा–या पाणी पुरवठयाच्या व्यवहारात रु. 519.86 लक्ष इतका नफा अपेक्षीत आहे. त्यामुळे नगरपालिकेची विनंती मान्य केल्यास प्राधिकरणाला 15.70 लाख उत्पन्न कमी मिळेल. तरीही 504.16 लक्ष इतका नफा राहील. तसेच प्राधिकरणाच्या इतर पाणी पुरवठा केंद्रातून विविध नगरपालिकांना केला जाणा–या ठोक पाणी पुरवठयाचा सुधारित दर रु. 4.60 / 1000 लि. एवढा आहे. याचा विचार केल्यास पनवेल नगरपालिकेस आकारण्यात आलेला रु.6.50 रु. / 1000 लि. दर जास्त वाटतो. या नगरपालिकेला केवळ न्हावा–शेवा पाणी पुरवठा योजनेतून पाणी मिळते. म्हणून हा दर लागला आहे पण तो महाराष्ट्रातील इतर नगरपालिकांना लागू असलेल्या दरापेक्षा फारच जास्त आहे. म्हणून नगरपालिकेची विनंती मान्य करण्यास हरकत नाही. यावर वेगवेगळया सदस्यांकडून निरनिराळया सूचना येऊ लागल्या. सदस्यांच्या सूचनांमध्ये दराबाबत एकसूत्रता आढळून न आल्याने मा. अध्यक्षांनी पाण्याचा दर 6.50/1000 लि. वरुन रु. 6.00/1000 लि. दिनांक 1.5.97 पासून लागू करण्याचे सूचविले . या सूचनेस सर्व सदस्यांनी सहमती दर्शविल्याने खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

ठराव :—

1. महा.जीवन प्राधिकरण असा ठराव करीत आहे की, प्राधिकरणाच्या इतर पाणी पुरवठा केंद्रातून नगरपालिकेला केल्या जाणा—या ठोक पाणी पुरवठयाच्या दराचा विचार करता पनवेल नगरपालिकेस दि. 1.5.97 पासून आकारण्यात येणारा दर रु. 6.50 / 1000 लि. जास्त वाटतो. म्हणून नगरपालिकेची विनंती अंशतः मान्य करुन त्यांना रु.6.00 / 1000 लि. हा दर दिनांक 1.5.97 पासून लागू करावा.
2. असाही ठराव करण्यात येतो की, आवश्यकता भासल्यास न्हावा—शेवा पाणी पुरवठा केंद्रातून पनवेल नगरपालिकेला होणा—या पाणी पुरवठयाच्या दराचा (रु.6.00/1000 लिटर) भविष्यात आढावा घेवून त्यात योग्य वेळी सुधारणा करण्यात यावी.
3. असाही ठराव करण्यांत येतो की, याबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत.

<u>कार्यक्रम बाब क्र. 6 :—</u> मंत्रीमंडळाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणासाठी मंजूर केलेल्या प्रादेशिक मुख्य अभियंता / अधिक्षक अभियंता इत्यादि कार्यालयांसाठी सहाय्यक कर्मचारी वर्ग निर्माण करणे :—

प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी सदर कार्यक्रम बाब विस्तृतपणे सभेपुढे कथन केली व विभागवार नव्याने निर्माण करण्यांत आलेल्या कार्यालयांसाठी आवश्यक असलेला विविध संवर्गातील एकूण 1,687 एवढा कर्मचारी वर्ग वाढवून मिळण्याची आवश्यकता सभेच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर सभेतील सदस्यांनी विस्तृत चर्चा करुन असे सुचविले की, एवढी पदे निर्माण करावी लागणार असल्याने या पदांच्या निर्मितीमुळे प्राधिकरणावर किती अतिरिक्त आर्थिक बोजा पडेल तो दर्शविण्यात यावा. प्राधीकरणास कामाच्या खर्चाच्या 17.50 टक्के आस्थापना अवजारे खर्चापोटी प्राप्त होतात त्यामधून हा अतिरिक्त भार पेलता येईल किंवा कसे तसेच पाणी पुरवठयाचा हा मोठा कार्यक्रम सर्वसाधारणपणे 2001 साली संपल्यानंतर या अतिरिक्त कर्मचारी वर्गाचे काय करणार या बाबी स्पष्ट करणे आवश्यक आहे. म्हणून वरील सर्व बाबींची माहिती तयार करुन ही कार्यक्रम बाब पुढील सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात यावी असे सभेत एकमताने ठरविण्यात आले.

<u>कार्यक्रम बाब क्र.7 :</u> मोरबे धरण प्रकल्प — वरोसे व वरोसेवाडी येथील प्रकल्पग्रस्तांच्या सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव :—

सदर कार्यक्रम बाब प्राधिकरणाचे मुख्य अभियंता, कोकण विभाग यांनी समितीपुढे सादर केल्यानंतर मोरबे धरण प्रकल्पात अडथळा निर्माण करणा—या वरोसे व वरोसेवाडी या खेडयातील प्रकल्पग्रस्तांना सानुग्रह अनुदान कश्याप्रकारे देता येईल व ते देण्याची आवश्यकता का आहे हे समितीच्या निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर चर्चा होऊन माननीय अध्यक्षांनी असे सुचविले की, मोरबे धरण प्रकल्पांतर्गत येणा—या वरोसे व वरोसेवाडी या दोन खेडयांव्यतिरिक्त आणखीन काही खेडयांना अशा प्रकारे सानुग्रह अनुदान देणे आवश्यक ठरणार असल्यास ते आत्ताच स्पष्ट करण्यांत यावे. यावर मुख्य अभियंता, कोकण विभाग, ठाणे, यांनी असे प्रतिपादन केले की मोरबे गावातील प्रकल्पग्रस्तांचे स्थलांतरण करतांना , त्यांना तत्कालीन मा.मंत्री, महसूल यांचे आदेशान्वये ज्या अनुदानाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे (व ज्यास अद्यापही मान्यता मिळालेली नाही ) त्या रकमेच्या 80 टक्के रक्कम अदा करण्यांत आलेली आहे. परंतू मोरबे गावाच्या प्रस्तावाबाबत देखील शासनाच्या महसूल खात्याकडून मान्यता न मिळाल्यास त्यांच्या सानुग्रह अनुदानाचा प्रश्न भविष्यात उद्भवू शकेल. शिवाय प्राधीकरणाच्या 73 व्या सभेत ज्या कारणांमुळे सानुग्रह अनुदानाच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाची मान्यता घ्यावी लागेली त्याच कारणांसाठी मोरबे प्रकल्पग्रस्तांबाबत देखील मान्यता घ्यावी लागण्याची शक्यता आहे.

यावर मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तथा अध्यक्षांनी असे सुचविले की वरील शक्यता लक्षात घेवून वरोसे व वरोसेवाडीच्या प्रस्तावाबरोबरच मोरबेच्या प्रकल्पग्रस्तांच्या सानुग्रह अनुदानाच्या प्रस्तावास ( आयुक्त, कोकण विभाग यांनी केलेल्या मुल्यांकनानुसार ) मंत्रीमंडळाची मान्यता मिळविण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे सादर करावा. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शविल्यानंतर खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव :–

मोरबे धरणाच्या वरच्या अंगास असलेल्या वरोसे व वरोसेवाडी येथील प्रकल्पग्रस्तांच्या सानुग्रह अनुदानाच्या रु. 1,25,35,272/– किंमतीच्या, आयुक्त, कोकण विभाग यांनी बांधकाम विभागाच्या प्रचलित दरानुसार शिफारस केलेल्या प्रस्तावास तसेच मोरबे गावातील प्रकल्पग्रस्तांच्या रु. 14,61,859/– सानुग्रह अनुदानाच्या आयुक्त, कोकण विभाग यांनी सादर केलेल्या प्रस्तावास प्राधिकरण मान्यता देत असून सदर प्रस्तावास मंत्रीमंडळाची मान्यता मिळविण्यासाठी वरोसे व वरोसेवाडी आणि मोरबे खेड्यांचा सानुग्रह अनुदानाचा प्रस्ताव एकत्रीतपणे मंत्रीमंडळापुढे सादर करण्यांत यावा. यासाठी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिवांना देण्यांत येत आहेत.

कार्यक्रम बाब क्र.8 : सुरेंद्र इंजिनिअरींग क्लेम.

याविषयीची कार्यक्रम बाब तयार करुन सभेपुढे सादर करण्यांत न आल्याने या बाबीवर चर्चा करण्यांत आली नाही. सबब, कार्यक्रम बाब पूढील सभेत ठेवण्यांत येईल.

कार्यक्रम बाब क्र. 9 : धुळे भूमिगत गटार योजना :– उर्वरित कामाच्या निविदेस मंजूरीबाबत :–

ही कार्यक्रम बाब मुख्य अभियंता, नाशिक यांनी सभेपुढे योजनेच्या पूर्व इतिहासासह सभेच्या निदर्शनास आणून दिली. यावर सविस्तर चर्चा होवून अशा प्रकारच्या कामासाठी संभाव्य अडचणी, कंत्राटदाराच्या दृष्टीने कामातील धोके, भरवस्तीतील कामे व कामे करण्यास पुरेशी जागा नसल्यामुळे घ्यावी लागणारी विशेष काळजी इत्यादी बाबींचा सभेत उहापोह होऊन सदर निविदेचा स्विकार न केल्यास व निविदा पुन्हा: बोलविल्यास कालापव्यय तर होईलच परंतु आताच्या दरापेक्षा कमी दराची निविदा प्राप्त होण्याची शाश्वती देता येणार नाही. हेही स्पष्ट करण्यांत येऊन धुळे भूमिगत गटार योजनेच्या उर्वरित कामांच्या मेसर्स मोतीराम बुधरमल, उल्हासनगर यांची कामाच्या अंदाजित किंमतीपेक्षा 35.46 टक्के जादा म्हणजे रु. 94.40 लक्ष किंमतीची निविदा स्विकृत करण्याचा निर्णय घेण्यात आल्यानंतर खालील प्रमाणे ठराव पारित करण्यांत आला.

ठराव :–

असा ठराव करण्यांत येतो की, धुळे भूमिगत गटार योजनेअंतर्गत भूमिगत गटार, सीवर लाईन संप, पंपगृह उध्दरण वाहिनी, ऑक्सिडेशन पॉंडची दुरुस्ती इत्यादि कामाकरिता मिळणारा अल्प प्रतिसाद विचारात घेवून मुख्य अभियंता यांनी दुस–या वेळेस जाहिर प्रसिध्दी देवून मागविलेली मे.मोतीराम बुधरमल, उल्हासनगर यांची निविदा की जी चालू दरसूचीनुसार येणा–या किंमतीपेक्षा 35.46 टक्के जास्त आहे. हे काम ठेकेदार निविदेत दर्शविलेल्या कालावधीत निश्चितपणे पूर्ण करेल या अटीच्या आधीन राहून ती स्विकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

असाही ठराव करण्यांत येतो की, निविदा स्विकारणेसंबंधीचे पुढील प्राधिकार प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना प्रदान करण्यांत येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.10:</u>** संरक्षण पाणी पुरवठा केंद्र, साकोरे, ता. निफाड, जि. नाशिक येथील जुनी पंपींग मशिनरी घसारा निधीतून खर्च करुन बदलणेबाबत :–

साकोरे ता. निफाड , जि. नाशिक येथील संरक्षण पाणी पुरवठा केंद्रातील जुनी पंपिंग मशिनरी घसारा निधीतून खर्च करुन बदलणेबाबत आवश्यकता असल्याचे सभेपुढे मुख्य अभियंता, नाशिक यांनी प्रस्तावित केल्यानंतर तयार करण्यांत आलेल्या कार्यक्रम बाबींप्रमाणे संरक्षण पाणी पुरवठा केंद्र, ता. साकोरे, जि. नाशिक या योजनेअंतर्गत खालील पंपींग मशिनरी घसारा निधीतून खर्च करुन बदलण्याच्या रु.63.83 लक्ष अंदाजित खर्चाच्या प्रस्तावास मंजुरी देण्यांत येवून प्रस्तावित खालील ठराव पारित करण्यांत आला.

1. अशुध्द पाणी उपसा केंद्र 75 हॉर्स पॉवर —– 2 नग.
2. शुध्द पाणी उपसा केंद्र 100 हॉर्स पॉवर —– 2 नग.
3. –"– 180 हॉर्स पॉवर —– 2 नग.
4. –"– 40 हॉर्स पॉवर —– 1 नग.

<u>ठराव :–</u>

प्राधिकरणाच्या मालकीचे साकोरे येथील संरक्षण पाणी पुरवठा केंद्रातील (ता.निफाड, जि.नाशिक) पंपींग मशिनरी बदलण्याच्या रु. 63.83 लक्ष अंदाजित किंमतीचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येत असून या कामाचा खर्च प्राधिकरणाकडील घसारा निधीतून करण्याची परवानगी देण्यांत येत आहे.

याबाबत पुढील सर्व कार्यवाही करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.11 :</u>** अक्कलकोट पाणी पुरवठा योजना —– टंचाई काळातील पाणी पुरवठा व त्या अनुषंगाने येणारी पाणीपट्टी याबाबत :–

अक्कलकोट पाणी पुरवठा योजनेद्वारे, टंचाई काळात अक्कलकोट शहरास करण्यांत आलेला पाणी पुरवठा व त्या अनुषंगाने आकारण्यात आलेली पाणीपट्टी यासंदर्भात नागरीकांच्या व विविध संस्थाच्या येणा–या तक्रारीवर दिनांक 8/5/97 रोजी राज्यमंत्री, नगर विकास यांचे दालनात आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत,या बैठकीस उपस्थित असलेले आमदार श्री. बाबासाहेब तानवडे व संबंधीत अधिकारी यांच्यामध्ये वरील विषयी सविस्तर चर्चा होऊन सदर चर्चेत आमदार श्री. बाबासाहेब तानवडे यांनी असे सुचविले होते की, प्रत्यक्ष जेवढे पाणी शहरास पुरविण्यात आले तेवढयाच पाण्याची देयके नागरीकांना देण्यात यावीत. यासंदर्भात मा. उपमुख्यमंत्री श्री.गोपीनाथजी मुंडे यांनी टंचाई काळातील पाणी पुरवठा दर कमी करण्याचे आश्वासन दिले होत असेही सदर बैठकीत सांगण्यात आले होते. यासंदर्भात करण्यात आलेल्या पाणी पुरवठयाची व त्याअनुषंगाने करण्यात यावयाची वसुली याबाबत मुख्य अभियंता, पुणे यांनी सभेस सविस्तर माहिती दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन मा.अध्यक्षांनी असे प्रतिपादन केले की, अशा प्रकारे पाणीपट्टी कमी करण्यांत आली तर एक वाईट पायंडा पडेल. त्यांनी पुढे असे सुचविले की, टंचाई काळात करण्यात आलेल्या पाणी पुरवठयापोटी ग्राहक तसेच संस्था यांचेकडून किती रक्कम वसुल करावयाची आहे त्याची सविस्तर माहिती पुरवावी. तसेच अक्कलकोट नगरपालिकेकडून प्राधीकरणास वेगवेगळया बाबीपोटी एकूण किती रक्कम देय आहे याचाही खुलासा करावा. ही योजना पूर्ण झाल्यानंतर ती ताब्यात घेण्यास नगरपालिका तयार आहे अशी माहिती मुख्य अभियंता, पुणे यांनी दिल्यानंतर मा.अध्यक्षांनी असे सुचविले की ज्यावेळी नगरपालिका प्रत्यक्ष योजना ताब्यात घेईल तेंव्हा प्रस्तावित कार्यक्रम बाबीवर विचार करावा तथापी मध्यंतरीच्या काळात जास्तित जास्त वसुली करण्याचा प्रयत्न करावा. वरील चर्चेनंतर सदर कार्यक्रम बाब नामंजूर करुन त्याबाबत पुढे विचार करावा असे ठरले.

**कार्यक्रम बाब क्र. 12 :** वेणा पाणी पुरवठा केंद्र, जि. नागपूर.
सन 1997 च्या उन्हाळयातील पाणी टंचाई निवारणार्थ तातडीची उपाय योजना :–.

यांविषयीची कार्यक्रम बाब मुख्य अभियंता, ठाणे यांनी वाचून दाखविली व योजनेच्या आवश्यकतेबाबत सभेपुढे विस्तृत माहिती दिली. महापौर, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांनी शहरास होणा–या सध्याच्या अपूर्ण पाणी पुरवठयामुळे हिवाळयातच पाण्याची भीषण टंचाई होत असते त्यामुळे उन्हाळयामध्ये नागपूरवासियांचे पाण्यावाचून अतोनात हाल होतात असे प्रतिपादन करुन परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी नागपूर शहरासाठी सध्या प्रगतीपथावर असलेली पाणी पुरवठा योजना लवकरात–लवकर पूर्ण केल्यास नागपूरवासियांचे थोडयाफार प्रमाणात पाण्याचे दुर्भिक्ष टाळेल, हे स्पष्ट केले. यादृष्टीने पाणी पुरवठा मंडळाने ही योजना झपाटयाने पूर्ण करावी असे सूचविण्यात आले. त्यानंतर सभेने प्रस्तावित कार्यक्रम बाबीस मान्यता दिली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :–

नागपूर येथील वेणा पाणी पुरवठा केंद्राकरीता सन 1997 चे उन्हाळयासाठी हाती घ्यावयाची तातडीची कामे अंतर्भूत असलेली रु. 62,73,225/– किंमतीची योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने "नियमित योजना" म्हणून घेण्याचा ठराव पारीत करण्यांत येत आहे. या योजनेसाठी 100 टक्के अनुदान शासनाकडून मिळणे अपेक्षित आहे, कारण ही योजना मुख्यत्वेकरुन संरक्षण आयुधे निर्माण करणा–या कारखान्यास पुरवठा करण्यासाठी आहे. तसेच ही योजना "नियमित योजना" म्हणून मंजूर करण्यासाठी शासनास सादर करण्याबाबत प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना अधिकार देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.13 :** राष्ट्रीय नदी कृती योजना राबविण्यासाठी नवीन विभाग व उपविभाग निर्माण करणे :

भारतातील प्रमुख नदयांचे प्रदुषित पट्टयांचे शुध्दीकरण करण्याकरिता केंद्र शासनाने राष्ट्रीय नदी कृती योजना राबविण्याचे ठरविले असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील कृष्णा व गोदावरी नदयांचे अनुक्रमे कराड, सांगली, नाशिक व नांदेड या 4 शहरांजवळील प्रदूषित पट्टयांचे शुध्दीकरण करणे प्रस्तावित असल्याची माहिती प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी सभेपुढे दिली. राष्ट्रीय कृती योजनेअंतर्गत करावयाच्या कामांसाठी संचालक, अेन.आर.सी.डी., नवी दिल्ली यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची स्वतंत्र विभागीय कार्यालये असावीत असा आग्रह केल्यानुसार विषयांकित कार्यक्रम बाब प्रस्तावित करण्यात आल्याचे त्यांना सांगितले. या अनुषंगाने निर्माण कराव्या लागणा–या नवीन विभागीय व उपविभागीय कार्यालयांची आवश्यकता असल्याचे त्यांनी सभेस अवगत केले. यावर सविस्तर चर्चा होऊन प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी अशी सूचना केली की, या योजनेअंतर्गत प्रस्तावित शहरांसाठी विभागीय कार्यालयांची निर्मिती न करता प्रत्येक शहरासाठी एक उप विभाग या प्रमाणे प्रस्तावित तीन शहरासाठी तीन उपविभागीय कार्यालयांची निर्मिती करण्यांत यावी व या उपविभागावर त्या शहरातील सध्या कार्यरत असलेल्या विभागीय कार्यालयाचे नियंत्रण ठेवावे. नवीन विभागीय कार्यालयांची निर्मिती न करताही केंद्र शासनाचा उद्देश फक्त स्वतंत्र उपविभागांच्या निर्मितीने साध्य होणार असल्याने विभागीय कार्यालयांच्या निर्मितीस प्राधीकरण मान्यता देत नसल्याचे शासनास कळवून ही बाब राज्य शासनाने केंद्र शासनास कळविण्याची विनंती करावी असे ठरले. यावर सर्व सदस्यांनी सहमती दर्शविल्याने खालील प्रमाणे ठराव करण्यांत आला.

ठराव :–

राष्ट्रीय नदी कृती योजनेअंतर्गत नांदेड, कराड व सांगली शहरांसाठीच्या योजना महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळामार्फत राबवावयाच्या असून या अनुषंगाने संचालक, राष्ट्रीय नदी संरक्षण निर्देशालय पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी सुचविल्यानुसार खालील प्रमाणे फक्त उपविभागीय कार्यालये उघडण्यांबाबत व त्या अनुषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्ट "अ" मध्ये नमुद केल्याप्रमाणे

पदनिर्मिती करण्याबाबत व त्या अनुषंगाने करावी लागणारी कार्यवाही करण्याचे संपूर्ण अधिकार सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

| अ.क्र. | शहर | उप विभागीय कार्यालय |
|---|---|---|
| 1. | कराड | 1 |
| 2. | सांगली | 1 |
| 3. | नांदेड | 1 |
| | एकूण .. | 3 |

<u>परिशिष्ट "अ"</u>

राष्ट्रीय नदी कृती योजना राबविण्यासाठी उपविभागीय कार्यालयासाठी लागणारा अधिकारी व कर्मचारी वर्ग :–

| अ.क्र. | पदनाम | प्रत्येक उपविभागीय कार्यालयासाठी लागणारी पदांची संख्या | वेतनश्रेणी (रु.) |
|---|---|---|---|
| 1. | 2. | 3. | 4. |
| 1. | उप अभियंता ( स्थापत्य ) | 1 | 2000–60–2300–दरो–75–3200–100–3500/– |
| 2. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | 4 | 1400–40–1800–दरो–50–2300 |
| 3. | कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) | 1 | 1400–40–1800–दरो–50–2300 |
| 4. | वरिष्ठ लिपीक | 1 | 1200–30–1560–दरो–40–2040 |
| 5. | अनुरेखक | 1 | 975–25–1150–दरो–30–1540 |
| 6. | कनिष्ठ लिपीक टंकलेखक / संगणक. | 2 | 950–20–1150–दरो–25–1500 |
| 7. | मिस्त्री | 2 | 950–20–1150–दरो–25–1400 |
| 8. | वाहनचालक | 1 | 950–20–1150–दरो–25–1500 |
| 9. | शिपाई | 2 | 750–12–870–दरो–14–940 |
| 10. | चौकीदार | 1 | 750–12–870–दरो–14–940 |
| | एकूण | 16 | |

कार्यक्रम बाब क्र. 14 : शासनाकडे कार्यकारी अभियंता संवर्गातील 2 पदे प्रतिनियुक्तीवर पाठविण्याकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात नवीन 2 पदे निर्माण करण्याबाबत..

प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी मंत्रालयातील पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे असलेल्या नागरी व ग्रामीण पाणी पुरवठा योजनांच्या तांत्रिक तपासणी करण्यासाठीची व अनुषंगीक तांत्रिक प्रकरणे हाताळण्यासाठी 2 कार्यकारी अभियंत्यांची पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने प्रतिनियुक्तीवर शासनाकडे पाठविण्याची विनंती केल्यानुसार शासनाकडे प्रतिनियुक्तीवर पाठविण्यासाठी सध्या उपलब्ध असलेल्या कार्यकारी अभियंत्यांना पाठविता येणे शक्य नसल्याने कार्यकारी अभियंता संवर्गातील 2 पदे प्राधिकरणास निर्माण करणे आवश्यक असल्यामुळे वरील प्रमाणे कार्यक्रम बाब तयार करुन सभेपुढे ठेवण्यात आली. यावर प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी शासनाकडे प्रतिनियुक्तीवर 2 कार्यकारी अभियंत्यांची आवश्यकता नसल्याने सदर कार्यक्रम बाब रद्द करण्याचे सुचविले व त्या अनुषंगाने सदर कार्यक्रम बाब रद्द करण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.15 : लातूर येथे मंडळ कार्यालयासाठी विभागीय कार्यालयाच्या इमारतीवर दुसरा मजला व अधीक्षक अभियंता यांचेसाठी निवासस्थान बांधणेबाबत..**

प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांनी सदर कार्यक्रम बाब व त्या अनुषंगाने कराव्या लागणा--या विभागीय कार्यालयाच्या इमारतीवर दुसरा मजला बांधणे व अधीक्षक अभियंता यांचेसाठी निवासस्थान बांधणे बाबतची माहिती सभेपुढे सविस्तर कथन केली. यावर सविस्तर चर्चा होवून कार्यक्रम बाब मंजूर करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव करण्यांत आला.

ठराव :--

लातूर येथील बार्शी रोडवरील मंडळाच्या मालकीच्या जागेवरील अस्तित्वातील विभागीय कार्यालयाच्या इमारतीवर 3रा मजला बांधणे व लांबी वाढविणे ( 393 चौ.मी.) तसेच अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थान बांधणे ( 130 चौ.मी.) इत्यादि बांधकामासाठी रु. 27,65,500/-- ढोबळ किंमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत असून यासाठी निधीची आवश्यक ती तरतूद, कार्यालयीन इमारती या लेखा शिर्षाखाली करुन इमारत बांधण्याच्या अनुषंगाने सर्व अधिकार सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत.

**कार्यक्रम बाब क्र.16 : महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळातर्गत अहमदनगर येथे निर्माण करण्यांत आलेल्या अधीक्षक अभियंता, परिसर अभियांत्रिकी मंडळाचे कार्यालय व अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थानाकरीता इमारती बांधणेबाबत..**

सदर कार्यक्रम बाब मुख्य अभियंता, नाशिक यांनी सविस्तर सभेपुढे मांडली . अहमदनगर येथे नव्याने उघडण्यांत आलेल्या मंडळ कार्यालयासाठी व अधीक्षक अभियंता यांचे निवासस्थानासाठी प्राधिकरणाच्या मालकीच्या जागेवर बांधावयाच्या इमारतीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर चर्चा होऊन रु. 29.42 लक्ष किंमतीच्या प्रस्तावास सदर कामाची सविस्तर अंदाजपत्रके केल्यानंतरच कामाच्या निविदा बोलाविण्याच्या अटीच्या अधीन राहून सभेने मान्यता दिली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :--

अहमदनगर शहरात अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय व निवासस्थानाकरीता मंडळाच्या मालकीच्या उपलब्ध जागेत सध्याच्या विभागीय कार्यालयाचे वर एक मजला वाढविणे व अधीक्षक अभियंता यांचेकरिता स्वतंत्र निवासस्थान बांधणे गरजेचे आहे. याकरीता मंडळाचे मालकीच्या जागेवर इमारती व निवासस्थाने बांधणेकरिता एकूण रु.29.42 लक्ष खर्चाच्या प्रस्तावास सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रके

तयार केल्यानंतरच कामाच्या निविदा बोलविण्याच्या अटीच्या अधीन राहून या ठरावाद्वारे मंजूरी देणेत येत आहे. याकरीता प्रस्तावित केलेल्या अंदाजित खर्चाची तरतूद, कार्यालयीन इमारत या लेखाशिर्षांमध्ये करणेबाबत व वर उल्लेखिलेल्या इमारती बांधणेबाबतचे सर्व अधिकार नियमांचे अधीन राहून सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र. 17 :</u>** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण मंडळ, नाशिक येथे निर्माण करण्यात आलेल्या मुख्य अभियंता यांची कार्यालये व निवासस्थानाकरिता इमारत बांधणेबाबत..

या कार्यक्रम बाबींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता यांच्यासाठी निवासस्थाने नाशिकरोड येथील संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या आवारात बांधण्याचे प्रस्तावित असल्याने प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी असे सुचविले की, नाशिक प्रशिक्षण केंद्राच्या आवारात फक्त त्या केंद्राच्या विस्ताराशी संबंधित अशीच कामे करावीत. यावर मुख्य अभियंता, नाशिक यांनी असे निदर्शनास आणून दिले की, नाशिक येथे प्राधिकरणाच्या मालकीच्या होलाराम कॉलनी, ओ.ओ.पी.स्टोअर व नाशिकरोड येथील संशोधन व प्रशिक्षण केंद्र येथे अनुक्रमे मुख्य अभियंता, नाशिक यांचे कार्यालय व अधीक्षक अभियंता यांची कार्यालये व निवासस्थानाकरीता इमारती बांधण्याचे प्रस्तावित आहे. नाशिक प्रशिक्षण केंद्रात फक्त प्रशिक्षण केंद्राशी संबंधित असलेली कामेच करावीत असे प्रधान सचिव यांनी सुचविले असल्यामुळे प्रशिक्षण केंद्राच्या आवारातील प्रस्तावित मुख्य अभियंता यांच्यासाठीचे निवासस्थान आता प्राधिकरणाच्या मालकीच्या होलाराम कॉलनीतील आवारात बांधण्यात येण्याचा प्रस्ताव सभेपुढे ठेवला. यावर सविस्तर चर्चा होवून असे ठरविण्यात आले की, मुख्य अभियंता निवासस्थान प्राधिकरणाच्या मालकीच्या होलाराम कॉलनीतील जागेवर बांधावे. या सर्व कामांच्या निविदा बोलविण्यापूर्वी प्रत्येक कामाची सविस्तर अंदाजपत्रके तयार करावीत. या अटींच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता देण्यात आली व खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

<u>ठराव :</u>

नाशिक शहरात मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांची कार्यालये व निवासस्थानांकरीता शासकीय इमारत उपलब्ध नसल्यामुळे मंडळाच्या स्वतःच्या इमारती बांधणे गरजेचे आहे. याकरिता होलाराम कॉलनीतील आणि ओ.ओ.पी. स्टोअरच्या मंडळाच्या मालकीचे जागेवर मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता, नाशिक यांच्या कार्यालयीन इमारती व निवासस्थाने बांधणेकरिता एकूण रु. 104.47 लक्ष खर्चाच्या प्रस्तावास या ठरावाद्वारे मंजुरी देण्यात येत आहे. याकरिता प्रस्तावित केलेल्या अंदाजित खर्चाची तरतूद कार्यालयीन इमारत या लेखाशिर्षांमध्ये करणेबाबत व वर उल्लेखलेल्या इमारती बांधणेबाबतचे सर्व अधिकार नियमांचे अधीन राहून सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

**<u>कार्यक्रम बाब क्र.18 :</u>** नांदेड येथील मंडळाच्या मालकीच्या प्रशासकीय संकलात विश्रामगृह अंतर्गत रस्ते, सुरक्षा भिंत बांधणे :—

ही कार्यक्रम बाब सदस्य सचिव यांनी सभेपुढे सविस्तर ठेवल्यानंतर अध्यक्षांनी असे सूचित केले की, मंडळाची आर्थिक स्थिती पाहिजे त्या प्रमाणात मजबूत नाही. त्यामुळे अशा कामांसाठी सध्या तरी खर्च करणे उचित ठरणार नाही. अर्थात प्राधीकरणाने यापूर्वीच्या सभांमध्ये हे धोरण ठरविले आहे की, ज्या ठिकाणी प्राधीकरणाच्या स्वतःच्या मालकीच्या जागा आहेत त्या ठिकाणी प्राधीकरणाची कार्यालये व विश्रामगृहे बांधावीत. त्यास अनुसरुन प्रस्तुत कार्यक्रम बाब मंजूर करावी परंतू विश्रामगृहांचे बांधकाम प्राधीकरणाची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत हाती घेवू नये. आर्थिक स्थिती सुधारताच विश्रामगृहांचे काम हाती घेण्याचा निर्णय सदस्य सचिवांनी घ्यावा असे ठरवून सदर कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली.

**<u>कार्यक्रम बाब क्र.19 :</u>** महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण प्रकल्प टप्पा—1 अंतर्गत शहाड उदंचन केंद्रातील 3 पंप घसारा निधीमधून खर्च करुन बदलण्याबाबत..

ही कार्यक्रम बाब मुख्य अभियंता, ठाणे यांनी सभेपुढे सविस्तर मांडताना सभेस या योजनेतून ज्या शहरांना पाणी पुरवठा केला जातो त्याची माहिती प्रत्येक शहरास करण्यात येणा–या पाण्याच्या प्रमाणासह अवगत केली. या योजनेवर कार्यरत असलेल्या 6 ( सहा ) पंपापैकी सद्या 4 पंप चालवून 210 द.ल.लिटर्स पाणी उचलणे अपेक्षीत आहे. तथापी सदर पंप गेली 10 वर्षे सतत चालू असल्याने त्यांच्या उदंचन क्षमतेत झालेली घट भरुन काढण्यासाठी राखीव दोन पंपापैकी एका पंपाचा सतत वापर करण्यात येत असल्याचेही त्यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले.

म.रा.विद्युत मंडळाकडून सारख्या खंडित होणारा वीजपुरवठा,वीज वापराच्या पीक अवर्समध्ये असणारा कमी दाब, यामुळे दिवसातून संपूर्ण 24 तास पंप चालविणे शक्य होत नसल्याने पुरेशा दाबाने वीज उपलब्ध असतानाचे कालावधीत अतिरिक्त पंप चालवून दिवसभरात पडत असलेली घट भरुन काढावी लागते असे सांगून त्यानुसार शहाड उदंचन केंद्रातील सहाही पंप चालवून पाणी पुरवठयातील अनियमितता कमी करण्यात आली आहे व त्यामुळे शहाड उदंचन केंद्रात राखीव पंप शिल्लक नाहीत असे स्पष्ट केले.

मिरा भाईंदर साठीच्या 10 द.ल.लि. क्षमतेच्या योजनेमध्ये एक नवीन पंप बसविण्यात आला असून तो मार्च, 97 मध्ये कार्यान्वित करण्यांत आला आहे. ठाणे,भिवंडी पालिकांना विजेच्या अनियमिततेमुळे होणा–या पाणी पुरवठयातील अनियमिततेवर उपाय म्हणून प्रत्येकी एक अतिरिक्त पंप घेण्यासाठी पूर्ण ठेव तत्वावर निधी देण्यासाठी नगरपालिकांना कळविण्यांत आले असून सदर प्रस्तावास भिवंडी नगरपरिषदेने मान्यता देऊन त्यांच्या वाटयाची पूर्ण ठेव भरली आहे. त्यानुसार कामही सुरु असून सप्टेंबर, 97 अखेरीस ते पूर्ण होईल. या दोन्ही पंपांनी भविष्यात 310 द.ल.लि. पाणी उचलावे लागेल त्यासाठी अतिरिक्त हेड लागेल, या बाबींचा विचार करुन नवीन पंप विकत घेण्यात येत आहे.

भाईंदर नगरपरिषदेच्या अतिरिक्त 50 द.ल.लि. क्षमतेच्या योजनेमध्ये शहाड येथे 52 द .ल.लि. क्षमतेचा पंप प्रस्तावित असून भिवंडीसाठी 25 द.ल.लि. क्षमतेच्या योजनेत या क्षमतेचा एक पंप प्रस्तावित आहे. हे दोन्ही पंप 310 द.ल.लि. पाणी उत्सर्जित करण्यासाठी लागणा–या हेडसाठी घेण्यांत येतील. म्हणजेच शहाड उदंचन केंद्रात मिरा–भाईंदर व भिवंडीसाठी आधी घेतलेले दोन व नवीन प्रस्तावीत दोन पंप असे एकूण 4 नवीन पंप राहतील.

शहाड येथून 310 द.ल.लि. पाणी सहा पंपाद्वारे उचलणे हे योजनेच्या संकल्पानुसार आहे. तथापि अस्तित्यातील जुने पंप हे 26 मिटर हेडवर 210 द.ल.लि. पाणी उत्सर्जक क्षमतेचे असून 310 द.ल.लि. पाणी उत्सर्जन करताना लागणा–या 30 लि. हेडसाठी या पंपाची क्षमता 46 टक्के इतकी कमी होते. तसेच त्यांची कार्यक्षमता 15 टक्के इतकी कमी होते. त्यामुळे प्राधिकरणाला अतिरिक्त विजबिलांचा फटका बसेल.

मिरा भाईंदर व भिवंडी साठीच्या विविध योजनांमधून 4 नवीन पंप प्राप्त झाल्याने तीन नवीन पंप प्राधिकरणाने घसारा निधीतून बदलल्यास उदंचन केंद्रात एकूण 7 नवीन पंप होतील व त्यापैकी 6 पंप एकाच वेळी चालवून 310 द.ल.लि. पाणी उत्सर्जन करता येईल व एक पंप राखीव राहील.

वरील प्रस्तावावरुन 3 नवीन पंप ( उत्सर्जक क्षमता 52 द.ल.लि. 30 मि. हेड) व त्यासाठी लागणारे इनडोअर टाईप ट्रान्सफॉर्मर सबस्टेशन व इतर अनुषंगिक कामे यासाठी 2.47 कोटी इतका खर्च अपेक्षीत आहे. यामुळे उदंचन केंद्राच्या वाढीव क्षमतेमुळे हा खर्च सुमारे 3 वर्षात भरुन निघेल व लाभधारक नगपालिकांना जास्त विश्वासार्हतेने पाणी पुरवठा करता येईल. सदरचा खर्च पाणी पुरवठा योजनेच्या घसारा निधीतून प्रस्तावित असून 95–96 अखेर या केंद्राचा घसारा निधी रु.10,97,27,098/– इतका उपलब्ध असून त्यातून हा खर्च भागविता येईल. यावर सर्व सदस्यांनी होकार दर्शवून सर्वानुमते नवीन पंप बसविण्याची गरज लक्षात घेऊन मान्यता देण्यात आली व खालील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत आला.

<u>ठराव :–</u> महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिःसारण प्रकल्प टप्पा–1 अंतर्गत सुयोग्य 3 पंप, इन डोअर टाईप ट्रान्सफॉर्मर सबस्टेशन व इतर अनुषंगिक कामे यासाठी घसारा निधीतून करावयाच्या रु. 2.47 कोटीच्या कामास प्राधिकरण मान्यता देत असून यासाठी पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिवांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.

**बाब 20 :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्मितीनंतर सदस्य सचिवांचे कार्यालयांतील तांत्रिक ळणा—या संरचनेचे पुनर्विलोकन व बळकटिकरण.

सदर कार्यक्रम बाब सविस्तरपणे सभेपुढे ठेवून सदस्य सचिवांचे कार्यालयांतील तांत्रिक कामे हाताळणा—या संरचनेचे पुनर्विलोकन व बळकटीकरणांसंबंधीची माहिती सदस्यांचे निदर्शनास आणून दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी अभियंत्यांच्या 2 पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविताना प्रस्तावांमध्ये या पदांच्या निर्मितीमुळे प्राधिकरणावर पडणारा अतिरिक्त आर्थिक भार नमूद करण्यांचे आधिन राहून कार्यक्रम बाब मंजूर करण्यांत आली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

**ठराव :—** ठराव करण्यांत येतो की, "महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या निर्मितीनंतर सदस्य सचिवांचे कार्यालयातील तांत्रिक कामे हाताळणा—या संरचनेचे पुनर्विलोकन केल्यावर या कार्यक्रम बाबी सोबत दिलेल्या प्रपत्राचे अनुषंगाने अभियंते व संगणकासंबंधी 17 पदे तसेच बिगर तांत्रिक 19 अशा एकूण 36 पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदस्य सचिवांना याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार देण्यांत येत आहेत."

**टेबल कार्यक्रम बाब क्र.1 :** सिमेंटचा पुरवठा करणेसाठी दर करार.

सदर कार्यक्रम बाबींवर सविस्तर चर्चा होऊन अध्यक्षांनी असे सुचविले की, सिमेंट पुरवठयाबाबत सध्या जी पध्दत मंडळामध्ये अवलंबविली जात आहे तीच पध्दत पुढील दोन महिन्यापर्यंत चालू ठेवावी. मध्यंतरीच्या सर्व सिमेंट उत्पादक कंपन्यांकडून थेट प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणापर्यंत सिमेंट पुरविण्यासाठीचे दर मागविण्यासाठी नवीन निविदा मागविण्यात याव्यात. वरील प्रमाणे कार्यवाही करावी असे सुचवून प्रस्तावित कार्यक्रम बाब नामंजूर करण्यांत आली.

**टेबल कार्यक्रम बाब क्र. 2 :—** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये विशेष कार्यकारी अधिकारी ( तां. ) यांना त्यांच्या कामात मदत करण्यासाठी आवश्यक त्या पदांची निर्मिती.

सदर बाबीवर सविस्तर चर्चा होऊन महाराष्ट्र शासनाने पिण्याच्या पाण्यास दिलेल्या प्राधान्याची श्वेत पत्रिका 1995 साठी प्रसिध्द केली. या अनुषंगाने शासनाने घेतलेला 2000 सालपर्यंत सर्व टँकरग्रस्त गावांसाठी पाणी पुरवठा योजना तयार करुन त्यांची अंमलबजावणी करावी. जेणेकरुन 2000 सालापर्यंत एकाही गावाला टँकरने पाणी पुरवठा करावा लागू नये. श्वेत पत्रिकेच्या अनुषंगाने करावयाच्या कामाचा आवाका बघता येत्या काही वर्षात नागरी तसेच ग्रामीण भागात खूप मोठया भांडवली खर्चाची कामे करावी लागणार आहेत. ही बाब सभेच्या निदर्शनास आणून दिली. यावर सर्व सदस्यांनी एकमत दर्शवून प्रस्तावास मान्यता दिली व खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

**ठराव :—** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात नव्याने निर्माण करण्यांत आलेल्या विशेष कार्यकारी अधिकारी (तां.) या पदावरील मुख्य अभियंता स्तरावरच्या अधिका—यास त्याच्या कामात मदत करण्यासाठी खालील नवीन पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव प्राधिकरणाच्या शिफारशीसह शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर करण्यास प्राधिकरण या ठरावाद्वारे मान्यता देत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| 1. | अधीक्षक अभियंता (स्थापत्य) | 3700–125–4700–150–5000 | 1 |
| 2. | कार्यकारी अभियंता(स्थापत्य) | 3200–100–3500–125–4625 | 2 |
| 3. | उप अभियंता (स्थापत्य) | 2200–75–2800–दरो–100–4000 | 4 |
| 4. | कॉम्प्युटर प्रोग्रामर<br>(स.अ.श्रेणी–1 च्या समकक्ष) | 2000–60–2300–दरो–75–3200<br>100–3500 | 2 |
| 5. | सहाय्यक 1 | 1400–40–1800–50–2300 | 4 |
| 6. | उच्चश्रेणी लघुलेखक | 2000–60–2300–दरो–75–3200 | 1 |
| 7. | कनि.लिपीक/टंकलेखक | 950–20–1150–दरो–25–1500 | 2 |
| 8. | वाहनचालक | 950–20–1150–दरो–25–1500 | 1 |

वरील पदांच्या निर्मितीचा प्रस्ताव शासनाकडे प्राधिकरणाचा प्रस्ताव म्हणून सादर करण्याचे अधिकार प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना देण्यात येत असून शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर सदर पदावर योग्य नेमणूका करण्याचे अधिकारही प्राधिकरणाच्या सदस्य सचिवांना देण्यात येत आहेत.

**<u>टेबल कार्यक्रम बाब क्र.3 :–</u>** राज्यातील नागरी तथा ग्रामीण भागात पाणी पुरवठा उपलब्ध करुन देणे. सदर कार्यक्रम बाब अधीक्षक अभियंता, म.नि.सं.सं. यांनी मा.मंत्री महोदयांच्या आदेशानुसार सादर करीत असल्याचे व त्यात फक्त नागरी तथा ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची सध्यास्थिती विशद केली असल्याचे सांगितले. तथापि सदर बाब सविस्तर बघणे आवश्यक असल्याने ती पुढील बैठकीत सादर करावी असे ठरले.

**<u>गोपनीय टेबल कार्यक्रम बाब क्र.4 :</u>** चकनंदगांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जि. चंद्रपूर योजनांसाठी पॅकेज जलशुध्दीकरण संयंत्रणेचा पुरवठा करणे, उभारणे व 3 वर्षाच्या कालावधीसाठी देखभाल व दुरुस्तीच्या कामाची निविदा स्विकृती.

सदर कार्यक्रम बाब मुख्य अभियंता, नाशिक यांनी सभेपुढे सविस्तरपणे मांडली. यावर विस्तृत चर्चा होऊन असे ठरविण्यांत आले की, चंद्रपूर जिल्हयातील जागतिक बँक अर्थसहाय्यीत ग्रामीण पाणी पुरवठा व परिसर स्वच्छता प्रकल्पांतर्गत चकनंदनांव प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेसाठी कमी धारणा शक्तीच्या ( 12600 लि. प्रति तास ) पॅकेज वॉटर ट्रीटमेंट प्लॅटच्या मेसर्स वॉटरटेक इक्वीपमेंटस, पुणे यांच्या रु. 11,88,000/– इतक्या किंमतीची निविदा सदर कंपनीने त्यांच्या पूर्वीच्या भागीदारापैकी उर्वरित भागीदार श्री.एम.सी. इंटवाला यांचेकडून आवश्यक तो दाखला आणून दिल्यानंतर स्विकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्यानंतर खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

<u>ठराव :–</u> चकनंदगाव प्रादेशिक पाणी पुरवठा योजना, जि. चंद्रपूर योजनेसाठी 12,600 लि. प्रति तास क्षमतेचे पॅकेज जलशुध्दीकरण सयंत्र पुरवठा करुन बसविणे व त्याची 3 वर्षासाठी. देखभाल दुरुस्ती करणे या कामासाठी मे. वॉटरटेक इक्विपमेंटस, पुणे यांची प्राप्त ग्राहय निविदामधील कमीत कमी किंमतीची रु. 11,88,000/– खर्चाची निविदा सदर कंपनीने त्याचे पूर्वीच्या भागिदारापैकी उर्वरित भागीदार श्री.एम.सी.इंटवाला यांचेकडून आवश्यक तो दाखला आणून देण्याच्या अटीच्या आधिन राहून मान्य करण्यांत येत आहे याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

**<u>टेबल कार्यक्रम बाब क्र.5 :–</u>** अहमदनगर पाणी पुरवठा योजना.. वाढीव कर्मचारी वृंद नेमणे व नगरपरिषदेस हस्तांतरण करणे संबंधी

सदर कार्यक्रम बाबीवर यापूर्वी झालेल्या प्राधिकरणाच्या 70व्या सभेत चर्चा होऊन त्यावेळी मंडळाने निर्देशित केल्यानुसार अतिरिक्त 14 पदे भरण्यास अहमदनगर नगरपरिषदेने पत्राद्वारे मान्यता दिल्याचे मुख्य अभियंता, नाशिक यांनी स्पष्ट केले. तसेच अहमदनगर नगरपरिषद ही योजना ताब्यात घेण्यास तयार असल्याबाबतचा ठराव प्राप्त झाला असून दि. 18.7.97 रोजी योजनेचे उद्घाटन समारंभाचे वेळी ही योजना 1.9.97 पासून ताब्यात घेण्यास तयार असल्याचे अध्यक्ष, नगरपरिषद अहमदनगर यांनी जाहीर केल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे ही 14 पदे निर्माण करुन सध्या अहमदनगर पाणी पुरवठा केंद्र चालविण्यासाठी कार्यरत असलेल्या 125 कर्मचा–यांतून अर्हताप्राप्त कर्मचा–यांच्या पदोन्नतीद्वारे ती भरण्यात यावीत व पदोन्नतीने रिक्त झालेल्या जागेवर मात्र प्राधिकरणाने कोणत्याहि कर्मचा–यांची नव्याने नियुक्ती अथवा बदली करु नये. असे अध्यक्षांनी सुचविल्यानंतर खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यांत आला.

<u>ठराव :–</u> अहमदनगर पाणी पुरवठा केंद्र व नुकतीच कार्यान्वीत केलेली टप्पा–3 पाणी पुरवठा योजना कार्यक्षमतेने चालविण्यासाठी नेमलेल्या वाघ समितीने वर्ग–3 मधील 14 पदे प्राधिकरणात निर्माण करणेबद्दल केलेली शिफारस ध्यानात घेता व ही पदे निर्माण झालेनंतर हे केंद्र अहमदनगर नगरपरिषदेस 1.9.97 पासून हस्तांतरीत करुन घेण्यास नगरपरिषदेने संमत्ती दिली असल्याने ही 14 पदे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणात निर्माण करणेसाठी या ठरावाद्वारे मंजुरी देणेत येत आहे. तसेच ही पदे निर्माण झालेनंतर उपलब्ध अर्हता प्राप्त योग्य अशा कर्मचा–यांना पदोन्नती देऊन भरणेत यावीत . मात्र पदोन्नतीने रिक्त झालेल्या जागेवर प्राधिकरणाने कोणत्याहि कर्मचा–यांची नव्याने नियुक्ती अथवा बदली करु नये. याबाबत पुढील कार्यवाही करण्याचे अधिकार प्राधिकरणाचे सदस्य सचिव यांना देण्यात येत आहेत.

<u>टेबल कार्यक्रम बाब क्र. 6 :–</u> प्राधिकरणातील विभागीय लेखापालांना पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे कार्यरत असलेल्या विभागीय लेखापालांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करणेबाबत..

वेळेअभावी सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊ न शकल्याने ही कार्यक्रम बाब पुढे ढकलण्यांत आली.